# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर,
४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा ( पूर्व), मुंबई - ४०० ०५१
फोन न. २६४७ ४८ ९२ फॅक्स न. २६४७ १६१९ ई मेल jtdirrom@gmail.com


क्र.२/विकामुं/तंशि/आस्था (१)/२०१७/२७३२
दिनांक : १९/८/२०१७

## कार्यालयीन आदेश :

विषय : कनिष्ठ लिपिक/लिपिक टंकलेखक या पदावर तात्पुरत्या स्वरुपातील पदोन्नती.

संदर्भ : १. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.आरटीआर-१०८५/८५३/प्र.क्र.७२-८५/तेरा, दि.१५/४/१९९१
२. उच्च व तं.शि. आणि सेवायोजन वि. शा.नि. क्र.जीईसी ३३९६/(७३७६)/तांशि-१, दि.१०/४/१९९७
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. बीसीसी/२००९/प्र.क्र.२९१/०९/१६ब, दि.५/११/२००९
४. वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु-१, दि.१४/१/२०१६
५. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही २०१५/प्र.क्र.३०३/का.१२, दि.१२.०९.२०१६
६. सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक बीसीसी-२०१६/प्र.क्र.२२८ए/१६/१६ब, दि. २९/५/२०१७
७. या कार्यालयाचे कार्यालयीन आदेश क्र.२/ विकामुं/तंशि/आस्था-२/२०१७/२६१७, दि.११/८/२०१७

उपरोक्त संदर्भ क्र.२ च्या शासन निर्णयान्वये सहसंचालक यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई हे वरील संदर्भ क्र.७ चे कार्यालयीन आदेशान्वये गठीत केलेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या शिफारशीनुसार खालील कर्मचाऱ्यांचे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या संस्थेत पदोन्नतीने तात्पुरत्या स्वरुपात पदस्थापना करीत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्यांचे नाव, सध्याचे पदनाम, वेतनश्रेणी व संस्थेचे नाव | कर्मचाऱ्यांचा जातीचा मुळ प्रवर्ग | पदोन्नतीचे पद, वेतनश्रेणी व नियुक्तीची संस्था | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. जितेंद्र धनजी बाबरीया, सफाईगार<br>वेतनश्रेणी रु. ४४४०-७४४० /-<br>ग्रे.वे. - रु. १३००/-<br>तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई | अ.जा. | लिपिक टंकलेखक<br>वेतनश्रेणी रु. ५२००-२०२००/-<br>ग्रे.वे.- रु. १९००/-<br>शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई | सर्वसाधारण अराखीव पदावर पदोन्नती |
| २ | श्री. सुरेंद्र नाना मेहेर, हमाल<br>वेतनश्रेणी रु. ४४४०-७४४० /-<br>ग्रे.वे. - रु. १३००/-<br>तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई | विमाप्र | लिपिक टंकलेखक<br>वेतनश्रेणी रु. ५२००-२०२००/-<br>ग्रे.वे.- रु. १९००/-<br>तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई | सर्वसाधारण अराखीव पदावर पदोन्नती |
| ३ | श्री. रामचंद्र सखाराम इष्टे<br>प्रयोगशाळा परिचर<br>वेतनश्रेणी रु. ४४४०-७४४०/-<br>ग्रे.वे. - रु. १३००/-<br>शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई | अ.ज. | लिपिक टंकलेखक<br>वेतनश्रेणी रु. ५२००-२०२००/-<br>ग्रे.वे.- रु. १९००/-<br>शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई | अ.ज. या प्रवर्गातील राखीव पदावर पदोन्नती |

वर नमूद केलेल्या कर्मचा-यांच्या पदोन्नत्या हया तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

१. पदोन्नतीच्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत हजर होणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना पदोन्नतीत स्वारस्य नाही असे समजून सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी नंतरच्या कर्मचाऱ्याचा विचार केला जाईल.

२. पदोन्नतीमुळे संबंधीतांना वेतननिश्चिती बाबतचा विकल्प शासन निर्णय वित्त विभाग क्र.पीएवाय/१०८२/ सीआर-११००(एक) एसईआर-३ दि.६/११/१९८४ मधील तरतुदीनुसार रुजू होण्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत कार्यालयास सादर करावा लागेल. ज्या कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजनेतंर्गत पदोन्नत पदाची वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. त्यांची पुन:श्च वेतननिश्चिती होणार नाही.

३. महाराष्ट्र नागरी सेवा (संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान आवश्यक ठरविण्याबाबत) नियम, १९९९ नुसार त्यांनी सामान्या प्रशान विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९.३.२००३ नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाचे आत विहीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहित मुदतीपूर्वी विहित प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांना सेवेत कायम करण्यात येणार नाही व याबाबत त्यांचे कोणतेही निवेदन विचारात घेतले जाणार नाही, अथवा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिली जाणार नाही. अथवा परिक्षा उत्तीर्ण होण्यास मुदतवाढ दिली जाणार नाही.

४. वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु-१, दि.१४.१.२०१६ नुसार उपरोक्त कर्मचाऱ्यांनी पदावर रुजू झाल्याच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत मराठी ३० श.प्र.मि. / इंग्रजी ४० श.प्र.मि. वेगाचे शासनाचे विहित केलेले टंकलेखन प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. विहित कालमर्यादेत टंकलेखन प्रमाणपत्र सादर न केल्यास त्यांना पदावनत करण्यात येईल.

५. त्यांची पदोन्नती ही त्यांच्या समाधानकारक कामाच्या अहवालावर चालू राहील, अन्यथा त्यांना पदावनत करण्यात येईल.

६. उपरोक्त कर्मचा-यांनी पदोन्नती नाकारल्यास संदर्भाधीन दि. १२.०९.२०१६ च्या शासन निर्णयात नमुद केलेल्या तरतुदी बंधनकारक राहतील.

७. त्यांची पदोन्नती मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई यांच्या मान्यतेच्या अधिन राहून करण्यात येत आहे. पदोन्नती नंतर भविष्यात कोणत्याही प्रशासकीय बाबी उद्भवल्यास त्यांना पदोन्नतीच्या पदावरुन पदावनत करण्यात येईल.

८. वरील अटी व शर्ती मान्य असलेबाबत त्यांनी त्यांच्या पदोन्नतीच्या पदावर हजर होतांना संबंधित प्राचार्य/कार्यालय प्रमुखांकडे वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे लेखी हमीपत्र लिहून देणे बंधनकारक राहिल.

९. पदोन्नती देण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे नियत सेवानिवृत्तीचे वय शासन प्रचलित नियमानुसार ५८ वर्षाचे राहील.

वरील अटी व शर्ती मान्य असल्यास त्यांनी त्यांच्या पदोन्नती झालेल्या पदावर तात्काळ हजर व्हावे. संबंधीत कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे पदग्रहण अवधी, दैनंदिन भत्ता व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील.

(प्रमोद अं. नाईक)
**सहसंचालक**
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रत : <u>माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.</u>

१. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म.रा. मुंबई
२. मा. अधिदान व लेखाधिकारी कार्यालय, मुंबई (मानार्थ) (कार्यालयप्रमुखांमार्फत)
३. प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई
४. लेखा विभाग, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई
५. संबंधीत कर्मचारी (संस्थाप्रमुखांमार्फत)
६. निवड नस्ती.